## ////आतील पानात वाचा

- ‘हलाल प्रमाणपत्रा’ला हद्दपार करा !
- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल...
- या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी ३० कोटी...



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध



Email : newsaksharaj2021@gmail.com


प्रत्येक क्षण हा काहीतरी
शिकवणारा असतो,
त्यामुळे आजच्या अडचणी
उद्याच्या यशाचा
पाया रचतील यावर विश्वास
ठेवा.


वर्ष : ०५ | अंक : ११२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०५ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# शहांचा आदेश, फडणवीस मिशन मोडवर; भाजपचं मायक्रो प्लानिंग

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०४, मुंबई :**

विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवणाऱ्या भाजपनं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. या निवडणुकांमध्ये क्रमांक एकचा पक्ष ठरण्यासाठी भाजपनं आक्रमक व्यूहनीती आखली आहे. अनेक ठिकाणी भाजप मित्रपक्षांच्या विरोधात निवडणूक लढत आहे. याकडे मिशन २०२९ ची तयारी म्हणून पाहिलं जात आहे.



भाजपला राज्यात कुबड्यांची गरज नाही, असं विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी गेल्याच महिन्यात केलं. भाजप २०२९ मध्ये राज्यात स्वबळावर लढेल, ही घोषणा शहांनी मागील वर्षी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यानच केली आहे. त्यासाठी भाजपनं गेल्या वर्षभरात पद्धतशीरपणे प्रयत्न केले आहेत. आता भाजपनं आपला मतांचा टक्का वाढवण्यासाठी पावलं टाकली आहेत.

२०१४ ते २०२४ या कालावधीत विधानसभेच्या ३ आणि लोकसभेच्या ३ निवडणुका झाल्या. या निवडणुका भाजप कधी स्वबळावर, तर मित्रपक्षांसोबत युती करत लढला. पण भाजपच्या मतांची टक्केवारी २५ ते २८ च्या दरम्यान राहिली. राज्यात एकहाती सत्ता आणायची असल्यास भाजपला किमान ४० टक्के मतं मिळवावी लागतील. त्यासाठीची रणनीती भाजपनं आखली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अखत्यारित येणाऱ्या वैद्यकीय मदत कक्षानं सामाजिक संस्थांच्या मदतीनं तीन मोठ्या कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या जातीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जाणार आहे. बंजारा, लमाणी, वाल्मिकी या सारख्या समूहांपर्यंत पोहोचण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. या जातींना सोबत आणून त्यांच्यापर्यंत शासकीय योजनांचे लाभ पोहोचवण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. कार्यक्रमांची सुरुवात नागपूरपासून होईल. तिथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ प्रमुख पाहुणे असतील. यानंतर दुसरा कार्यक्रम केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या उपस्थितीत नवी मुंबईत होईल. तर तिसरा आणि शेवटचा कार्यक्रम नांदेडमध्ये आयोजित केला जाईल.

श्री गुरु तेग बहादूर साहेब यांच्या हौतात्म्याला ३५० दिवस होत असताना हा कार्यक्रम घेतला जाईल. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित असतील. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपनं १३२ जागा जिंकल्या. भाजपनं शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोबत युतीत निवडणूक लढवली. या निवडणुकीत भाजपनं २६.७७ टक्के, तर शिवसेनेनं १२.३८ टक्के मतं घेतली. राष्ट्रवादीला ९ टक्के मतदान झालं. २०२९ मध्ये भाजपला स्वबळावर लढायचं आहे. त्यासाठी भाजपला ४० टक्क्यांचा टप्पा ओलांडावा लागेल.

राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरातमध्ये भाजपनं एकहाती सत्ता मिळवलेली आहे. तिथे भाजपच्या मतांची टक्केवारी ४० टक्क्यांच्या पुढे आहे. आता तीच कामगिरी भाजपला महाराष्ट्रात करावी लागेल. भाजप आणि शिवसेनेचा मतदार सारखाच आहे. दोघांची व्होट बँक एकच म्हणजेच हिंदुत्त्ववादी असल्यानं भाजपच्या विस्तारवादी धोरणाचा सर्वाधिक धोका शिवसेनेला असेल.

## देवगावात महिन्याभरात तिसरा बिबट्या जेरबंद !

**•परिसरात भीतीचे सावट...**



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.०४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात बिबट्यांचा धुमाकूळ सुरूच असून, आज (४ डिसेंबर) पहाटे आणखी एक बिबट्या पिंजऱ्यात कैद झाला. गेल्या महिनाभरात या भागात पकडला गेलेला हा तिसरा बिबट्या ठरला आहे. उसाच्या शेतांमध्ये वाढलेल्या वावरामुळे देवगाव परिसर ‘बिबट्या–प्रवण’ क्षेत्र बनत चालला असल्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

गट क्रमांक ४१४/२ मधील पोलिस पाटील सुनील बोचरे यांच्या शेताजवळ उभारलेल्या पिंजऱ्यात साधारण पाच वर्षांचा नर बिबट्या सकाळी अडकलेला आढळला. माहिती मिळताच वनरक्षक विंचूर विजय दोंदे, माजी सैनिक अंकुश गुंड, आधुनिक बचाव पथक निफाडचे सागर दुसिंग, भारत माळी, विजय माळी, सादिक शेख, वैभव दौंड, शरद चांदोरे, मयुर गांगुर्डे व समाधान चव्हाण यांनी धाव घेऊन बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले.

दरम्यान, पिंजऱ्यालगत आणखी एक बिबट्या बसून असल्याचे शेतकऱ्यांना दिसून आले. ग्रामस्थांची गर्दी वाढताच तो जवळच्या उसाच्या शेतात पसार झाला. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आणखी दाटले आहे.

गत काही आठवड्यांपासून देवगाव, रुई, धानोरे, कानळद, शिरवाडे वाकद, देवगाव फाटा, वाकद आणि मानोरी परिसरात बिबट्यांच्या सतत हालचाली होत आहेत. शाळा परिसर, शेतमार्ग आणि रस्त्यांवरही बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. विद्यार्थ्यांची उपस्थिती, शेतीकामे तसेच रात्रीची हालचाल यावर लक्षणीय परिणाम होताना दिसतो आहे.

## वैराग–सुर्डी रस्त्याची दयनीय अवस्था; प्रशासनाचे दुर्लक्ष



**अक्षराज : साहेबराव परबत**
**दि.०४, वैराग (सोलापूर) :** वैराग–सुर्डी या महत्त्वाच्या रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. उसाने भरलेले ट्रॅक्टर, लोडेड ट्रक आणि मोठ्या वाहनांची सतत ये जा मध्ये वाढ झाल्यामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. रस्त्यावर पडलेले खोल खड्डे आणि होल यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

चारचाकी वाहनधारकांचे तर हाल अधिकच झाले आहेत. रस्त्यावरील दगड आणि खोल खड्ड्यांमुळे अनेकांच्या वाहनाच्या इंजिनला, ऑइल टँकला आणि चेसिसला धक्का बसत असून वाहने खराब होण्याचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः यावली पाटी जवळील छोट्या पुलावर मोठे खड्डे पडल्याने तो भाग अत्यंत धोकादायक बनला आहे.

रस्त्याची ही अवस्था आरोग्य सेवेलाही अडथळा ठरत आहे. पेशंटला दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी साधारण १५ मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी तब्बल एक तास लागतो, अशी स्थानिकांची व्यथा आहे. आकस्मिक रुग्णांच्या बाबतीत तर ही परिस्थिती जीवघेणी ठरू शकते, असा नागरिकांचा इशारा आहे.

स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस हालचाल न झाल्याने रोष वाढला आहे. लवकरात लवकर रस्ता दुरुस्त न झाल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

नागरिकांची मागणी आहे की,
तात्काळ खड्डे बुजविण्याचे काम सुरू करावे...
यावली पाटीजवळील छोटा पूल तत्काळ दुरुस्त करावा...
उस वाहतुकीचे नियोजन करून रस्त्यावरील ताण कमी करावा...
प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्ता पूर्ववत करावा, हीच सर्वांची मागणी आहे.

## मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी १७ कोटींची मान्यता

### आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिली मंजुरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.०४, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरण, सुरक्षाविषयक सुविधांच्या उभारणी आणि नूतनीकरणासाठी आवश्यक असलेला ₹१७ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मंजूर केला आहे.

आज विधानभवनातील मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या भेटीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विमानतळाच्या सुरक्षाविषयक अडचणी आणि उडान क्लबच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधांबाबत सविस्तर माहिती देत निधीची मागणी केली. आ. मुनगंटीवार यांच्या आग्रही मागणीला प्रतिसाद देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्वरित मंजुरी दर्शवली आहे.



मोरवा विमानतळ परिसरात वैमानिक प्रशिक्षण संस्था म्हणून नागपूर उडान क्लब, भारत सरकारच्या नागरी विमान संचालनालयाच्या (डीजीसीए) मान्यतेनुसार कार्यरत आहे. या ठिकाणी सुरक्षित, आधुनिक आणि नियमांनुसार विमान संचालनासाठी सुरक्षाविषयक व मूलभूत सुविधांची उभारणी अनिवार्य आहे. यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण कामांबाबत आज आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. डीजीसीए च्या नियमांनुसार पुढील अत्यावश्यक सुविधांची उभारणी आवश्यक असून परिमिती तपासणी मार्गाचे बांधकाम,विमानतळाभोवती उपलब्ध संरक्षण भिंतीची उंची वाढविणे, हँगर व फ्युएल स्टोरेजपर्यंत जाण्यासाठी सुरक्षित संपर्क मार्ग, विमानतळाच्या चारही दिशांना सुरक्षा देखरेख टॉवरचे बांधकाम, मुख्य इमारतीसमोरील भागात हाय–मास्ट प्रकाशयोजना, स्वागत द्वार, गार्ड रूम, पार्किंग व्यवस्था आणि रेस्ट हाऊस उभारणी या सर्व कामांसाठी एकूण ₹१७ कोटी निधीची मागणी केली.

विमान सुरक्षेचे महत्त्व आणि उडान क्लबच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेली कामे तातडीची असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला संपूर्ण सकारात्मकता दाखवत ₹१७ कोटींच्या निधीस त्वरित मंजूरी दिली.

मोरवा विमानतळाचे आधुनिकीकरण, विस्तारीकरण आणि सुरक्षा मजबूत करण्याच्या या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील विमान प्रशिक्षण आणि विमानचालन क्षेत्राला नवे बळ मिळेल, असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद करत मुख्यमंत्री महोदयांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## बोगस लग्न लावून देत नवऱ्या मुलाच्या कुटूंबियांना घातला लाखोंचा गंडा

## चहासाठी गाडी थांबवली अन, नवरी झाली फरार...

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
**दि.०४, पालम (परभणी) :**

पालम तालुक्यातील केरवाडी शिवारातील हनुमान मंदिरात बुधवार ३ डिसेंबर रोजी एक विवाह सोहळा पार पडला, थाटामाटात सोहळा पार पडल्यानंतर नवरा मुलगा नवरीला घेऊन पूणे येथे जाण्यासाठी कारने निघाला. चहा घेण्यासाठी गाडी अंबाजोगाई येथील एका हॉटेलवर गाडी थांबवली. मात्र ही संधी साधून पाठीमागून आलेल्या एका कारमध्ये बसून नववधू दागिण्यासह पसार झाली. बोगस लग्न लावून देणाऱ्या टोळीने हा प्रकार केल्याची चर्चा आहे




पुणे येथील एक कुटुंब मुलाच्या लग्नासाठी मुलगी पाहण्यासाठी नातेवाइकांसह विवाह जमविणाऱ्या एजंट मंडळींच्या संपर्कात आले असल्याची संधी साधून विनायक जाधव, रेखा सूर्यवंशी, रंजना मोरे, नवनाथ बंडगीरे, प्रविण कानेगावकर, पालम शहरातील मीना काकडे व माने नामक एक महिला यांच्या संपर्कात आले. नवरा मुलगा असलेला किरण रोहिदास मोरे, त्याची आई अंजना रोहिदास मोरे, बहिण पूजा रोहिदास मोरे, रतन भिकू बोबडे सर्व राहणार पर्वती, पुणे यांना पालम शहरात बोलवून घेत एका घरी घेऊन गेले. त्या ठिकाणी पुर्ण नियोजित कटाप्रमाणे अगोदरच एक मुलगी जिचे नाव सरला मधुकर कोलते रा. धनगर टाकळी ता.परभणी असे बोगस आधार कार्ड तयार करून ती दाखवून दोन लाख नव्वद हजार रुपये रोख व पस्तीस हजार रुपये किंमतीचे मनी मंगळसूत्र,जोडवे असे दागिने मिळून तीन लाख पंचवीस हजार रुपये घेऊन मुलीचे लग्न दि.३ डिसेंबर रोजी दुपारी १:३० वाजता केरवाडी शिवारातील हनुमान मंदिरावर लावून देण्याचे ठरले.

या प्रमाणे हनुमान मंदिरात लग्न लावून देत, नवरी मुलगी पुणे येथे पाठविण्यासाठी गाडीमध्ये बसूवुन पाठवून दिली. नवरा मुलगा नवविवाहित नवरीला सोबत घेऊन जात असताना अंबाजोगाई पर्यंत एका गाडीने सदरील कुटुंबाचा पाठलाग करणे चालू होते. पण या पाठलाग करणाऱ्या गाडीच्या बाबतीत नवऱ्या मुलाच्या कुटूंबियांना कसलीही कल्पना नव्हती, त्यामुळे अंबाजोगाई येथे चहापाणी साठी गाडी थांबवली असता दागिन्यासह नवरी मुलगी फरार झाल्याचे दिसून आले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सदरील नवर्या मुलाच्या कुटुंबाने पालम पोलीस ठाणे गाठून पोलीस निरीक्षक एस.के.खटाणे यांना आपबिती सांगितली. पोलीस निरीक्षकांनी तातडीने तपास चक्र फिरवत पालम शहरातील दोन एजंट महिलांना ताब्यात घेऊन चौकशी चालू केली आहे. वृत्त लिही पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती.

## संपादकीय



### अजित आगरकरांची मोठी खेळी

रायपूर : भारताचे माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी आता बीसीसीआयच्या बैठकीसाठी मोठा गेम केल्याचे समोर आले आहे. कारण बीसीसीआयने अजित आगरकर यांना मिटींगसाठी बोलवले होते. ही बैठक रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबाबत होती. पण अजित आगरकर यांनी या बैठकीपासून पळ काढल्याचे म्हटले जात आहे. कारण अजित आगरकर यांनी या बैठकीला जाणं टाळलं आणि रोहित शर्माच्या खास मित्राला या बैठकीला पाठवलं. त्यामुळे नेमकं घडतंय तरी काय, हे आता समोर येत आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना गौतम गंभीर व अजित आगरकर सापत्न वागणूक देत असल्याचे समोर आले होते. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी उघडपणे या दोघांना विरोध करायला सुरुवात केली. त्यामुळे भारतीय संघातील वातावरण बिघडले. भारतीय संघातील भांडण चव्हाट्यावर आले. त्यासाठी बीसीसीआयने गौतम गंभीर आणि अजित आगरकर यांना बैठकीसाठी बोलावले होते. पण या बैठकीपूर्वी अजित आगरकर यांना काही अंतर्गत गोष्टी समजल्या असतील, त्यामुळे त्यांनी बीसीसीआयच्या बैठकीला न जाण्याचा निर्णय घेतला. अजित आगरकर यांनी यावेळी आपल्या जागी रोहित शर्माच्या खास मित्राला बैठकीला पाठवलं. हा खास मित्र रोहित शर्माबरोबर संवाद साधू शकतो आणि जे काही वातावरण बिघडलं आहे, ते सावरून घेऊ शकतो. अजित आगरकर यांनी आपल्या निवड समितीमधील सदस्य आणि माजी क्रिकेटपटू प्रग्यान ओझाला रोहित शर्मा व विराट कोहलीबरोबर संवाद करण्यासाठी पाठवले होते. पण अजित आगरकर स्वत: या बैठकीला आले नाहीत, त्यामुळे बीसीसीआय त्यांच्यावर नाराज असल्याचे म्हटले जात आहे. प्रग्यान ओझाने रोहित शर्मा, विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्याशी अनौपचारीक चर्चा केली. पण या चर्चेमधून काहीच निष्पन्न झाले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आगरकर यांची ही मोठी खेळी फसल्याचे म्हटले जात आहे.

बीसीसीआयने जी बैठक बोलावली होती, त्यासाठी आगरकर यांनी रोहित शर्माच्या मित्राला पाठवले खरे. पण त्यांची ही खेळी निष्फळ ठरली आहे.

## ७ डिसेंबर रोजी हिरक महोत्सवी सोहळा...

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.०५, ठाणे :** चौकुळ ग्रामस्थ संघटना, मुंबई या संघटनेला यंदा ६० वर्षे पूर्ण झाली असून हिरक महोत्सवी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

माजी केंद्रीय मंत्री व खासदार नारायण राणे, आमदार दिपक केसरकर, खासदार संजय पाटील, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार डॉ. निलेश राणे, आमदार निरंजन डावखरे, मुलुंडचे माजी नगरसेवक प्रभाकर शिंदे, डॉ. नयन गावडे व डॉ. महेश गावडे, ऍडव्होकेट भास्कर परब यांच्या उपस्थितीत संघटनेचा हिरक महोत्सवी सोहळा रविवार ७ डिसेंबर २०२५ रोजी मुलुंड पूर्वेकडील आर. आर. सभागृहात साजरा केला जाणार आहे.

यावेळी स्मरणिका प्रकाशन, सेवानिवृत्त ग्रामस्थ, शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य बजावलेल्या ग्रामस्थ बंधू-भगिनींचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेच्या वतीने परशुराम गावडे सहाय्यक सुरक्षा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी आणि प्रभाकर चव्हाण यांनी दिली.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे.

तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे.

त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी



होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच

रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या.

जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# 'हलाल प्रमाणपत्रा'ला हद्दपार करा !

दिल्लीत संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. पुण्यातील भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी देशात अवैधरित्या चालणाऱ्या हलाल प्रमाणपत्र सक्तीवर अधिवेशनात नुकताच आवाज उठवला. प्रमाणपत्राची व्याप्ती आणि प्रक्रिया यांवर त्यांनी गंभीर आक्षेप नोंदवले. हलाल शब्द केवळ मांसापुरता मर्यादित राहिला नसून रसायने, प्लास्टिक, सिमेंट, दूध, साखर, तेल आणि आता तर औषधे यांनाही अवैधरित्या हलाल प्रमाणपत्र घेणे सर्वत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

हलाल हा एक पंथाचा धार्मिक विषय असून तो केवळ मांसापुरता मर्यादित असायला हवा आणि त्याबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सरकारने द्यायला हवे. धार्मिक आधारावर रोजच्या वापरांतील वस्तू अवैधरित्या प्रमाणित करण्याच्या सक्तीबाबत त्यांनी यावेळी जोरदार आक्षेप नोंदवला. भारत हे पंथनिरपेक्ष राष्ट्र आहे जिथे सर्व पंथांचे लोक राहतात. अशा ठिकाणी अवैध हलाल प्रमाणपत्राची सक्ती करणे हे अन्य पंथीयांकरीता अन्यायकारक असल्याने त्यावर त्वरित बंदी घालण्याचीही मागणी त्यांनी यावेळी केली.

हलाल प्रमाणपत्राचा विषय मागील तीन चार वर्षांपासून देशभरात मोठ्या प्रमाणात गाजतो आहे. जागतिक पातळीवर अनधिकृतपणे समांतर अर्थव्यवस्था उभारणाऱ्या हलाल प्रमाणपत्राने भारतातही आपले हातपाय घट्ट रोवले आहेत. या प्रमाणपत्राचे धोके ओळखून उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने हलाल प्रमाणपत्रावर बंदी घातली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रातही हलाल प्रमाण पत्राच्या नोंदीवर आणि हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणावी यासाठी हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटना मागील काही काळापासून सरकारचा पाठपुरावा करत आहेत, सरकार दरबारी निवेदने देत आहेत, सनदशीर मार्गाने आंदोलने करत आहेत. जागतिक पातळीवर काही मुस्लिम संघटना अनधिकृतपणे हलाल सर्टिफिकेशनची योजना राबवत आहेत.

त्यांच्या शाखा आज भारतभर निर्माण झाल्या आहेत. एखाद्या कंपनीला आपले उत्पादन आखाती देशांत किंवा मुस्लिबहुल भागात विकायचे असेल, तर अशा कंपन्यांना हलाल सर्टिफिकेशन करणे या संघटनांकडून अनिवार्य करण्यात आले आहे. या संघटना व्यापारी कंपन्यांकडून लक्षावधी रुपये घेऊन त्यांना हलाल प्रमाणपत्र देतात.

या प्रमाणपत्रासोबत उत्पादनावर छापण्यासाठी लोगो देण्यात येतो. मुस्लिमबहुल भागात तेथील नागरिक हा लोगो पाहूनच उत्पादने खरेदी करतात, असे यांच्याकडून सांगण्यात येते. एकदा हलाल प्रमाणपत्र घेतल्यावर दरवर्षीने नूतनीकरण करण्यासाठी पुन्हा हजारो रुपये या संघटना व्यापाऱ्यांकडून वसूल करतात. या सर्व प्रक्रियेत त्या देशातील सरकारला कोणताही लाभ होत नाही. सरकार दरबारी या सर्व व्यापाराची कोणतीही अधिकृत नोंद नसते. या योजनेतून गोळा करण्यात आलेल्या पैशातून आज हलाल इकॉनॉमी जागतिक पातळीवरील एक बलाढ्य इकॉनॉमी झाली आहे. या योजनेतून मिळणारा पैसा जगभरात पकडल्या गेलेल्या आतंकवाद्यांना न्यायालयीन साहाय्य पुरवण्यासाठी वापरला जातो हे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. यासंदर्भातील अनेक व्हिडीओज आणि लेख गूगलवर उपलब्ध आहेत. भविष्यातील धोका ओळखून उत्तर प्रदेश सरकारने राज्यात विखुरलेल्या या संघटनांची पाळेमुळे खणून काढायला सुरुवात केली आणि राज्यात हलाल सर्टिफिकेशन करण्यावर बंदी घातली आहे. उत्तर प्रदेश राज्यात भाजपचे सरकार आहे. तोच भाजप पक्ष आज महाराष्ट्र आणि केंद्र सरकारमधील प्रमुख पक्ष आहे. त्यामुळे उत्तर प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्रातही हलाल उत्पादनांवर आणि सर्टिफिकेशनवर बंदी घालण्याची मागणी होऊ लागली आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या हलाल इकोनॉमीच्या अनधिकृत सर्टिफिकेशनवर आता अनेक राष्ट्र बंदी घालण्याच्या तयारीत असून काही राष्ट्रांनी याबाबत कडक धोरण आखले आहे. खाद्यपदार्थांच्या संदर्भात कायद्यानुसार 'भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण' (एफएसएसएआय) या शासकीय संस्थेला खाद्यपदार्थांचे मानके ठरवण्याचा व प्रमाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात आला आहे; मात्र 'हलाल प्रमाणन' ही एक समांतर प्रणाली उभी करण्यात आली आहे, जी खाद्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत भ्रम निर्माण करून सरकारी नियमांचे उल्लंघन करते. महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीरपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून अब्जावधी रुपये गोळा करण्यात येत आहेत. स्वत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना अवैधरित्या प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. हलाल इकोनॉमीला सहकार्य म्हणजे आतंकवादाला समर्थन हे समीकरण लक्षात घेऊन हलाल प्रमाणपत्र घेणाऱ्या कंपन्यांवर, उपहारगृहांवर आणि वस्तूंवर नागरिकांनी बहिष्कार घालायला हवा ! वस्तू विकत घेताना त्यावर हलाल चिन्ह आहे का पडताळावे, हॉटेल, रेस्टरंटमध्ये जाताना बोर्डावर, मेन्यूकार्डावर हलालचे चिन्ह आहे का तपासावे. असे चिन्ह असलेले पदार्थ खरेदी करणे टाळावे, हलाल सर्टिफिकेशन आतंकवादाला कसे खतपाणी घालते याविषयी ग्राहक आणि विक्रेत्यांचेही प्रबोधन करावे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम करणाऱ्या आणि आतंकवादाला पोसणाऱ्या हलाल प्रमाणिकरणाला राज्यासह देशातून हद्दपार करण्यासाठी नागरिकांनीही जनजागृती चळवळ उभारायला हवी.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# सर्पदंशावर महाराष्ट्र सरकारचा स्वागतार्ह निर्णय

राज्यात विशेषतः ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना घडत असतात. साप चावल्यानंतर त्याचे विष किती घातक व सर्पदंशानंतर संबंधितावर वेळीच उपचार करणे शक्य व्हावे यासाठी स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किट खरेदी करण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल. राज्यांतील आरोग्य संस्थांना ३४ जिल्ह्यासाठी किट खरेदीची परवानगी देण्यात आली आहे. यासाठी ६ कोटी १४ लाख ४३ हजार ७४८ रुपयांच्या खर्चास राज्य सरकारने मान्यता दिली असल्याचे वृत्त आहे. राज्यांतील सर्पदंशग्रस्त रूग्णांच्या उपचारात क्रांतिकारी बदल घडवणारा महत्वपूर्ण निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. सर्पदंशानंतर रुग्णांवर केलेल्या उपचारापूर्वी दंश विषारी सर्पाचा आहे की नाही याची तत्काळ माहिती स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किट यामुळे मिळणार आहे.



त्यामुळे या निर्णयाला राज्यभरातील सर्व आरोग्य संस्थांना खरेदी प्रक्रियेस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या किटमुळे सर्पदंशच्या प्राथमिक उपचारात अचूक निदान शक्य होणारं असून अँटी स्नेक विनोमचा अनावश्यक वापर टळून रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी मदत होणारं आहे. ग्रामीण भागांसह दुर्गम भागात साप चावण्याचे प्रमाण अधिक आहे. वेळेत उपचार न झाल्याने अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे. शेतकरी रात्रंदिवस शेतामध्ये काबाड कष्ट करत असताना साप चवल्याच्या ताज्या घटना आहेत. राज्य सरकारने अशा रुग्णांवर तातडीने उपचार व्हावेत यासाठी घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल. स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किटमुळे लवकर निदान झाल्याने ग्रामीण व आदिवासी भागातील रुग्णांना सर्वाधिक दिलासा मिळणार आहे.

**- राजू जाधव मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# टाकळी ढोकेश्वर परिसरात कांदा रोपांचे तुटवडा

## कांद्याच्या रोपाला कांद्यापेक्षा अधिक भाव

तालुक्यातील काही शेतकऱ्यांचे कांदा रोप अवकाळीने गेले, तरीही पुन्हा बियाणे घेऊन रोपे टाकली आहेत, तर अनेक शेतकऱ्यांनी पेरणी करून कांदा लागवड केली आहे. सध्या रोपांचे वाढलेले भाव, मजुरीत झालेली वाढ, खत - औषधांचा वाढलेल्या दराचा मेळ बसत नसल्याने कांदा उत्पादन खर्च परवडणारा नाही. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. कांदा रोपांच्या तुटवड्यामुळे यावर्षी कांद्याची लावणी कमी प्रमाणात होण्याची शक्यता आहे.

**- सिताराम देठे, कांदा उत्पादक शेतकरी, बहिरोबाचीवाडी**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** अवकाळी पावसाने कांद्याची रोपे खराब झाल्याने पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरात रोपांचा तुटवडा निर्माण झाला आहे. रोपांच्या किमती गगनाला भिडल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.



अतिवृष्टीचा परिणाम सर्वच शेतकऱ्यांच्या शेतमालावर झाला असून पिकांचे मोठे नुकसान झाले. साठवलेल्या जुन्या कांद्याचेही नुकसान झाले, तर पावसातून वाचलेला कांदा बाजारभाव नसल्याने कवडीमोल किमतीत विकावा लागला. यातून शेतकऱ्यांना खर्च हीभागला नाही. यातून सावरत असताना शेतकऱ्यांना पुढील कांदा लागवडीसाठी आवश्यकतेप्रमाणे कांदा बियाणांची पेरणी केली. कांद्याच्या रोपांची चांगली उगवण झाली होती. परंतु अवकाळी पावसाने पुन्हा कांद्याची रोपे खराब झाली. परिणामी नवीन कांदा लावणीसाठी सध्या टाकळी ढोकेश्वर परिसरात रोपांचा तुटवडा भासू लागला आहे. कांद्यापेक्षा कांद्याच्या रोपाला अधिक भाव असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. रोपांच्या तुटवड्यामुळे त्यांच्या किमती गगनाला भिडल्या असून नव्याने कांदा लागवड कशी करायची अशी विवंचना शेतकऱ्यांपुढे आहे.

# शासकीय कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ आ.सत्तार यांच्या हस्ते संपन्न



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०३, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** कंकराळा ता.सोयगाव येथील प्रगती जिनिंग प्रेसिंग येथे सीसीआय (भारतीय कपास निगम लिमिटेड) यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शासकीय कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, केशवराव तायडे, सिल्लोड - सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास पा. दाभाडे, उपसभापती संदीप राऊत , धरमसिंग चव्हाण, गोपी जाधव, सीसीआय केंद्राचे संचालक के. पी. मीना , शुभदीप खान आदींची प्रमुख उपस्थिती होती. कंकराळा येथील सीसीआय केंद्रामुळे शेतकऱ्यांचा कापूस शासनाच्या आधारभूत किमतीनुसार खरेदी होणार असून यामुळे खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबणार असल्याचे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी व्यक्त केले. सोयगाव येथे जिनिंग प्रेसिंग तसेच सीसीआय केंद्र सुरू व्हावे. ही येथील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासून मागणी होती. देश स्वातंत्र्य झाल्यापासून पहिल्यांदा येथे जिनिंग ची स्थापना व सीसीआय ची खरेदी होत आहे. या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केले. तसेच प्रगती सह.जिनिंग प्रेसिंग ही शेतकऱ्यांच्या मालकीची जिनिंग प्रेसिंग असून ही जिनिंग अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुसज्ज व्यवस्थेसह परिपूर्ण आहे. शेतकऱ्यांनी पूर्व नोंद करून या कापूस खरेदी केंद्रावर पाठवावे असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शेतकरी सतीश गजानन बिंदवाल रा.तिडका, गजानन लक्ष्मण ढगे रा.आमखेडा तसेच ट्रॅक्टर चालक कृष्णा संजय ढाकरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विश्वास पाटील यांनी केले, सूत्रसंचालन संतोष बोडखे यांनी तर शेवटी विलास वराडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास दारासिंग चव्हाण, कुणाल राजपूत, राधेश्याम जाधव, शेख सलीम ,भारत तायडे, अक्षय काळे, राजू दुतोंडे, कदिर शहा , हर्षल काळे ,संदीप सुरडकर, भगवान जोहरे, गजानन कुडके, अतिश ताठे ,दिलीप देसाई, मेघराज राठोड ,आत्माराम पवार ,बद्री चव्हाण ,इब्राहिम देशमुख ,नाजीम पठाण, नारायण राठोड, सांडू राठोड, अविनाश पाटील, मुबारक शेख, फिरोज पठाण, डॉ. देशमुख, रवींद्र परदेसी, शरद पाटील, समाधान तायडे, शिवप्पा चोपडे, मोहन सुरडकर, देविदास राजपूत, छोटेसिंग राजपूत, भारत राठोड ,विश्वास चव्हाण, शेख जाकीर, शेख मुख्तार, उस्मान पठाण, मेहबूब खान, अयुब खान ,नवाब खान, भीमराव बोराडे, अजीम सय्यद, प्रवीण कदम, गजानन ढगे ,सिराज पठाण ,खंडू पाटील, राजमल पवार आदींची उपस्थिती होती.

# दिव्यांगाना सन्मानाने जगण्याची हमी देणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी - आ.दाते

## पारनेर येथे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त साहित्य वितरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** देश-विदेशात अनेक दिव्यांग व्यक्तींनी त्यांच्या दिव्य शक्तीने मोठी कार्ये साध्य केली आहेत. आपल्या तालुक्यातील दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांचे जीवन सुलभ व स्वावलंबी करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न मी सातत्याने करत आलो असून संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान जे दीड हजार रुपयांवरून अडीच हजार रुपये करण्यात आले.

याबाबतचा प्रश्न प्रथमत: मीच विधानसभेत मांडला. तालुक्यातील प्रत्येक दिव्यांगाची साथ, सुविधा व सन्मानाने जगण्याची हमी देणे हीच एक लोकप्रतिनिधी म्हणुन माझी जबाबदारी असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी आज केले.

जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून पारनेर पंचायत समितीच्यावतीने समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य व साहाय्यक साधनांचा वाटप सोहळा आमदार दाते यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते व्हीलचेअर, सी.पी. चेअर, रोलेटर वॉकर तसेच गृहमार्गदर्शन अध्ययन-अध्यापन साहित्य संच आदी साहित्याचे तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी वाटप करण्यात आले, त्यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांशी संवाद साधताना ते बोलत होते.

पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले की, जिल्हा परिषदेत कार्यरत असताना अपघात मदत योजना, सायकल वितरण, रोजगार सानुग्रह अनुदान, साहित्य साधनांची मदत अशा अनेक योजनांतून दिव्यांग सेवेला नेहमीच प्राधान्य दिले असून हे कार्य पुढेही अधिक सक्षमपणे सुरू राहील. दिव्यांग कायदा अधिनियम २०१६ व २०१७ च्या माध्यमातून शासन स्तरावर दिव्यांगांसाठी अनेक सुधारणा व उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी संजय गांधी निराधार योजना, यु.डि. आय.डी कार्डची सक्ती, मानधनात वाढ, नोकरीत चार टक्के आरक्षण आदी निर्णयांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे अत्यावश्यक आहे. सम



ाजातील दिव्यांगांच्या प्रगतीसाठी प्रशासन, समाज आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे पुढे आले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

सोमवार ते गुरुवार जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नियमित फिजिओथेरपी थेरपिस्ट उपलब्ध असून सेवेमुळे विद्यार्थ्यांना शारीरिक बळ मिळत असल्याचे सांगत समावेशित शिक्षण विभागात सध्या ९३४ दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी ३२ विद्यार्थ्यांना आवश्यक साधनांचे वितरण करण्यात आल्याचे तसेच ७ विद्यार्थ्यांना विशेष अध्यापन साहित्य संच देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय ५६४ विद्यार्थ्यांना विविध भत्ते मिळून १८ लाख ३५ हजार रुपये दिवाळीपूर्वी PFMS प्रणालीद्वारे त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आल्याची माहिती विशेष शिक्षक आंबेकर यांनी प्रास्ताविकात दिली.


या कार्यक्रमास विस्तार अधिकारी विनेश लाळगे, महेश सांळुके, देवराम पिंपरकर, विषयतज्ञ सुरेश सोनवणे, विशेष शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश सोनवणे यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दृढतेचे कौतुक करत कार्यक्रम यशस्वी केला.

सहाय्यक साधनांच्या वितरणामुळे लाभार्थ्यांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू दिसत होते. अनेक लाभार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आमदार दाते व प्रशासनाचे मनपूर्वक आभार व्यक्त केले.

# राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तिकरण पुरस्कार-२०२५' प्रदान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, मुंबई :** महाराष्ट्रातील दिव्यांगजनांच्या कल्याणासाठी कार्यरत संस्था आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग व्यक्ती यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तीकरण पुरस्कार- २०२५' प्रदान करण्यात आले. आंतरराष्ट्रीय दिव्यांगजन दिनाचे औचित्य साधून नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित या सोहळ्यास केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉ.वीरेंद्र कुमार आणि दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या सचिव बी. विद्यावती यांच्यासह अनेक



मान्यवर उपस्थित होते. नागपूरच्या अबोली विजय जितना यांना सर्वोत्कृष्ट दिव्यांगजन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जितना या नागपूरच्या पहिल्या व्हीलचेअर मॉडेल आणि प्रेरक वक्ता म्हणून ओळखल्या जातात. तर, पुण्यातील भाग्यश्री मनोहर नादी मित्तला कन्ना यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या श्रवण बाधित असूनही कला आणि व्यावसायिक कौशल्य शिक्षिका म्हणून त्यांनी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच, कुमारी धृती रांका (पुणे) हिला श्रेष्ठ दिव्यांग बाल-बालिका श्रेणीत सन्मान मिळाला. धृती 'टिकलर आर्ट'ची संस्थापक असून न्यूरो-डायव्हर्स कलाकारांच्या आजीविकेला प्रोत्साहन देते आणि तिने शार्क टँक इंडियासह अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. याव्यतिरिक्त प्रसिद्ध ऑडिओलॉजिस्ट आणि समाजसेविका देवांगी पराग दलाल (विलेपार्ले, मुंबई) यांनाही पुरस्कृत करण्यात आले. त्यांनी जोश फाउंडेशनच्या माध्यमातून २००० हून अधिक मुलांना मोफत श्रवण यंत्रे आणि थेरपी प्रदान केली आहे. संस्था श्रेणीत जय वकील फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर (मुंबई) या संस्थेला बौद्धिक आणि विकासात्मक दिव्यांगता असलेल्या व्यक्तींच्या सशक्तीकरणासाठी सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून गौरविण्यात आले. तसेच, डिजिटल सुगमता क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करणाऱ्या बॅरियर ब्रेक सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (मुंबई) ला सर्वोत्कृष्ट सुगम्य माहिती तंत्रज्ञान श्रेणीतील पुरस्कार मिळाला आहे.

# थोडक्यात

## राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी एस.एन.डी.टी. महिला कबड्डी संघाची निवड



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०४, मुंबई :** २७वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे दिनांक ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान आयोजित केला असून या महोत्सवात एस.एन.डी.टी. युनिव्हर्सिटी मुंबई कबड्डी संघाची निवड करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेसाठी एस.एन. डी.टी.महिला विद्यापीठाच्या स्पोर्ट्स डायरेक्टर डॉ.कविता खोलगडे यांनी सर्व निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. संघ प्रशिक्षक म्हणून जिग्नेश मोरे यांची निवड करण्यात आली आहे.

निवड झालेले खेळाडू : गौरी कदम (कर्णधार), श्रुती बेंद्रे, रचना म्हात्रे, कशिश पाटील, गौरी जाधव, सानिया इंगळे, रिद्धी हडकर, आचल पाल, धनश्री कोकरे, पियुष्का शिंदे, तनुजा लाड, जान्हवी शिगवण, अभिलाषा पाष्टे, प्रणाली माने.

संघ प्रशिक्षक : जिग्नेश मोरे

## प्रकल्पात बाधित झोपडीधारकांना पर्यायी घरे दिल्याशिवाय हटवू देणार नाही - वैराट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पुणे :** मुळा मुठा नदीपात्राच्या लगत वसलेल्या ताडी गुत्ता झोपडपट्टी येरवडा येथील झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या शाखेच्या उद्घाटन नुकतेच संघटनेचे अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या हस्ते करण्यात आले.

ताडी गुत्ता झोपडपट्टी ही मुळा मुठा नदीपात्राच्या लगत असल्याने पावसाळ्याच्या कालावधीत वारंवार पूर नियंत्रणाच्या कक्षेत आल्याने जीव हानी आणि मालमत्तेची नुकसान होऊ नये, म्हणून तात्पुरते स्थलांतरित करून पावसाळा संपला की, पुन्हा झोपड्यातील बिराडे पूर्वीच्या जागेवर संसार थाटतात. त्यांचा कायमचा निवारा पक्या घरात होण्यासाठी झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी प्रकल्पात बाधित होणाऱ्या झोपडीधारकांना पर्यायी पुनर्वसन झाल्याशिवाय झोपड्या हटवू देणार नाही, असा इशारा देखील भगवानराव वैराट ह्यांनी दिला. सामाजिक चळवळीच्या नेत्या प्राध्यापक आसमा शेख म्हणाल्या की, गोरगरिब झोपडपट्टीवासीयांची राहणीमान उंचवण्यासाठी चांगली घरे देऊन पुणे शहर झोपडपट्टी मुक्त करावे, असे त्यांनी विचार मांडले.

यावेळी कामगार सुरक्षा दलाचे सरचिटणीस काशिनाथ गायकवाड, राज्यसंघटिका सुरेखा भालेराव, दिना शेखर, गणेश लांडगे, गुलशन शेख, आयुब शेख, राजश्री चव्हाण, इत्यादींची भाषणे झाली.

## सप्तश्रृंगी धनोजे कुणबी महिला ग्रुपची माणिकगड किल्ल्यास भेट




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** येथील सप्तश्रृंगी धनोजे कुणबी महिला ग्रुप च्या महिला सदस्यांनी नुकतीच गडचांदूर नजिकच्या प्रसिद्ध माणिकगड किल्ल्यास भेट देऊन येथील ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले. सोबतच जवळच असलेल्या पुरातन वास्तुकलेचे उत्तम उदाहरण म्हणून परिचित असलेले विष्णू मंदिर तसेच निसर्गरम्य अंमलनाला धरण आणि परिसरास भेट देऊन पर्यटनाचा आनंद घेतला. प्रा. योगिता धांडे यांच्या मार्गदर्शनात सप्तशृंगी ग्रुपच्या माध्यमातून चंद्रपुरात महिलांचे मोठे संघटन असून विविध सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकसित होणारे उपक्रम वर्षभर घेतले जातात.

## एनएमएमटी ची आयटीएमएस प्रणाली व बस ट्रॅकर ॲप पूर्ववत कार्यान्वित

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, नवी मुंबई :** महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आयटीएमएस सर्व्हरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने एनएमएमटी ची बस ट्रॅकर ॲप सेवा सेवा बंद झाली होती. तथापि एनएमएमटीच्या आयटीएमएस विभागामार्फत ही तांत्रिक अडचण तातडीने दुरूस्ती करून दूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे एनएमएमटी बस ट्रॅकर ॲप प्रणालीदेखील सुरळीत सुरू झालेली आहे. त्यामुळे प्रवाशांना या ॲपद्वारे बसगाड्यांविषयी माहिती ट्रॅक करता येणार आहे, तसेच बसेसच्या लोकेशन्सची माहिती पूर्ववत उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे ॲप द्वारे मिळाणाऱ्या इतरही सुविधांचा लाभ घेता येणार आहे. अचानक उद्भवलेल्या या तांत्रिक अडचणीमुळे दरम्यानच्या काळात प्रवाशांना झालेल्या असुविधेबद्दल नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करण्यात येत असून या कालावधीत प्रवाशांनी केलेल्या सहकार्याबद्दल नमुंमपा परिवहन प्रशासनाकडून आभार मानण्यात येत आहेत.